।। सा विद्या या विमुक्तये ।।

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपुरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED

"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)

Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड.

**ACADEMIC (1-BOARD OF STUDIES) SECTION**

Phone: (02462) 229542
Fax : (02462) 229574

Website: www.srtmun.ac.in

E-mail: bos.srtmun@gmail.com


संलग्नित महाविद्यालयांतील मानवविज्ञान विद्याशाखेतील पदवी स्तरावरील तृतीय वर्षाचे **CBCS Pattern** नुसारचे अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२१–२२ पासून लागू करण्याबाबत.

# प रि प त्र क

या परिपत्रकान्वये सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, मा. विद्याशाखेने **दिनांक २२ मे २०२१ रोजीच्या बैठकीतील केलेल्या शिफारशीप्रमाणे व दिनांक १२ जून २०२१ रोजी संपन्न झालेल्या ५१ व्या मा. विद्या परिषद बैठकीतील विषय क्र. १५/५१–२०२१**च्या ठरावानुसार प्रस्तुत विद्यापीठाच्या **संलग्नित महाविद्यालयांतील मानवविज्ञान विद्याशाखेतील पदवी स्तरावरील तृतीय वर्षाचे** खालील विषयांचे **C.B.C.S. (Choice Based Credit System) Pattern** नुसारचे अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२१–२२ पासून लागू करण्यात येत आहेत.

01. B. A. -III Year- Marathi
02. B. A.- III Year- Hindi
03. B. A. - III Year- English
04. B. A. -III Year- Urdu
05. B. A. - III Year- Sanskrit
06. B. A. -III Year- Pali
07. B. A. - III Year- Kannada
08. B. A.- III Year- Economics
09. B. A.- III Year- Policital Science
10. B. A.- III Year- Sociology
11. B. A.- III Year- Philosophy
12. B. A.- III Year- Geography
13. B. A. -III Year – Psychology
14. B. A. - III **Year History**
15. B. A.-III Year- Public Administration
16. B. A.- III Year- Military Science
17. B. A.-III Year- Administrative Services

सदरील परिपत्रक व अभ्यासक्रम प्रस्तुत विद्यापीठाच्या **www.srtmun.ac.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. तरी सदरील बाब ही सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावी, ही विनंती.

'ज्ञानतीर्थ' परिसर,
विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६.
**जा.क्र.:**शैक्षणिक–१/परिपत्रक बी.ए./पदवी–सीबीसीएस अभ्यासक्रम/२०२१–२२/८७
**दिनांक** : २४.०७.२०२१.

स्वाक्षरित
**सहा.कुलसचिव**
शैक्षणिक (१–अभ्यासमंडळ) विभाग

प्रत माहिती व पुढील कार्यवाहीस्तव :
१) मा. प्र. अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा, प्रस्तुत विद्यापीठ
२) मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
३) प्राचार्य, सर्व संबंधित संलग्नित महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ.
४) साहाय्यक कुलसचिव, पदव्युत्तर विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.
५) उपकुलसचिव, पात्रता विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.
६) सिस्टम एक्सपर्ट, शैक्षणिक विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.
७) अधीक्षक, परिक्षा विभाग मानवविज्ञान विद्याशाखा प्रस्तुत विद्यापीठ.

D:\Som2\Dept./Adm Ser.TY syllabus 1.p65 1

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,

नांदेड

Syllabus of

# B.A. In Administrative Service
# Faculty of Humanities

(Third Year)

Semester Pattern

(Choice Based Credit System)

With Effect From June-2021

**Chairman**
**Dr. Subhash Kadam**
**Bos in Administative Services**

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

## B.A. in Administrative Service III Year

विषय, अभ्यासपत्रिका, गुण व श्रेयांक पद्धती (CBCS) पॅटर्न प्रमाणे

सत्र पाचवे

| अ. क्र. | विषय | अभ्यासपत्रिका क्रमांक | अभ्यासपत्रिका नाव | आठवड्याच्या तासिका | एकूण तासिका | अंतर्गत मूल्यमापन (CA) गुण | सत्रांत परीक्षा (ESE) | एकूण गुण | श्रेयांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | C-SAT | AS ३३ | C-SAT | ४ | ५० | २५ | ५० | ७५ | ३ |
| २ | भूगोल | AS ३४ | जगाचा भूगोल भाग -१ | ४ | ५० | २५ | ५० | ७५ | ३ |
| ३ | राज्यशास्त्र | AS ३५ | मानवी हक्क | ४ | ५० | २५ | ५० | ७५ | ३ |
| ४ | अर्थशास्त्र | AS ३६ | सार्वजनिक आय-व्यय | ४ | ५० | २५ | ५० | ७५ | ३ |
| ५ | इतिहास | AS ३७ | प्राचीन भारताचा इतिहास | ४ | ५० | २५ | ५० | ७५ | ३ |
| ६ | विज्ञान | AS ३८ | भौतिकशास्त्र भाग - १ | ४ | ५० | २५ | ५० | ७५ | ३ |
| ७ | SEC-III | | कौशल्य विकास (SEC) विषय | ३ | ४० | २५ | २५ | ५० | २ |
| | | | एकूण ( अ ) | | | | | ५०० | २० |
| | | | सत्र सहावे | | | | | | |
| १ | भूगोल | AS ३९ | जगाचा भूगोल भाग - २ | ४ | ५० | २५ | ५० | ७५ | ३ |
| २ | राज्यशास्त्र | AS ४० | मानवी संसाधन | ४ | ५० | २५ | ५० | ७५ | ३ |
| ३ | अर्थशास्त्र | AS ४१ | औद्योगिक अर्थशास्त्र | ४ | ५० | २५ | ५० | ७५ | ३ |
| ४ | इतिहास | AS ४२ | महाराष्ट्राचा इतिहास | ४ | ५० | २५ | ५० | ७५ | ३ |
| ५ | विज्ञान | AS ४३ | विज्ञान विकास (तंत्रज्ञान, जैवतंत्रज्ञान व आपत्ती व्यवस्थापन) | ४ | ५० | २५ | ५० | ७५ | ३ |
| ६ | विज्ञान | AS ४४ | भौतिकशास्त्र भाग - २ | ४ | ५० | २५ | ५० | ७५ | ३ |
| ७ | SEC-IV | | कौशल्य विकास (SEC) विषय | ३ | ४० | २५ | २५ | ५० | २ |
| | | | एकूण (ब ) | | | | | ५०० | २० |
| | | | एकूण (अ +ब) | | | | | १००० | ४० |

टीप : १. बी.ए. तृतीय पदवी वर्गाच्या प्रत्येक सत्रातील कौशल्य विकास अभ्यासपत्रिकेपैकी कोणतीही एक अभ्यासपत्रिका निवडता येईल.

२. विद्यापीठाने निर्धारित केलेला पर्यावरण अभ्यासक्रम अनिवार्य असेल.

**Chairman**

**Dr. Subhash Kadam**

**Bos in Administrative Services**

D:\Sem2\Dept./Adm Ser.TY syllabus 1.p65 3

# Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded
## B.A. In Administrative Service (CBCS Pattern)
### Third Year ( Sem. V)
### C-SAT
### Paper No. : AS 33

**Credit : 03** **Periods : 50** **Marks: 75**

---

**अभ्यासक्रमाची उदिष्टये:**

01. यु.पी.एस.सी. व एम.पी.एस.सी. इ. स्पर्धा परीक्षेमध्ये C-SAT हा पेपर ठेवण्यात आलेला आहे. या परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना C-SAT पेपरविषयी माहिती करुन देणे.
02. विद्यार्थ्यामधील आकलन, निरीक्षण, मूल्यमापन इ. कौशल्याचा विकास करणे.

**निष्पत्ती :**

01. विद्यार्थ्यांमध्ये बौध्दिक आकलन, निरीक्षण, मूल्यमापन इ. कौशल्य विकसित होतील.
02. स्पर्धा परीक्षेमधील C-SAT या अभ्यासक्रमावर आधारित प्रश्न सोडविता येतील.

**अभ्यासक्रम घटक**

1. उताऱ्याचे आकलन
2. बैठे व्यवस्था
3. आलेख्र अकलन
4. कोडे
5. नाते संबंध
6. दिशा
7. विधान - तर्के, कारणे
8. परिच्छेदाचे आकलन व निष्कर्ष - इनपूट आऊटपूट
9. तर्क संगत शब्द क्रम
10. इनपूट आऊटपूट
11. निर्णय क्षमता
12. कोडीन डिकोडीन
13. पेपर कटिंग
14. पाण्यातील व आरशातील प्रतिमा
15. आंर्तभूत प्रतिमा
16. चित्रकोडे
17. घन
18. पेपर फोल्डिंग
19. अपूर्ण क्रम पूर्ण करणे
20. शब्द कोडे अंककोडे

*** संदर्भ ग्रंथ :**


1. सामान्य अध्ययन सी-सैट- जे.के. चोपडा.
2. राज्यसेवा पूर्व परीक्षा - C-SAT समग्र मार्गदर्शन विनायक घायाळ.
3. General Studies $ C-SAT Dr. Manish Rannjan (IAS)
4. C-SAT Drishti
5. C-SAT Comprehension श्री. महेश शिंदे.


......................

# Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded

## B.A. In Administrative Service (CBCS Pattern)

### Third Year ( Sem. V)

भूगोल

जगाचा भूगोल भाग - 1

**Paper No. : AS 34**

**Credit : 03** **Periods : 50** **Marks: 75**

---

**अभ्यासक्रमाची उदिष्टये:**

01. जगाच्या प्राकृतिक भूगोलाची माहिती देणे.
02. खंडांची माहिती देणे.
03. भूकंप व ज्वालामुखी यांची माहिती देणे.
04. विविध भूरूपांची माहिती देणे.
05. स्पर्धा परीक्षेत येणाऱ्या जगाच्या भूगोलाविषयीची माहिती करुन देणे.

**निष्पत्ती :**

01. जागाच्या प्राकृतिक भूगोलाची माहिती विद्यार्थ्यांना होईल.
02. पृथ्वीवरील भूरूपशास्त्राची माहिती विद्यार्थ्यांना होईल.
03. पृथ्वीच्या अंतरंगात होणारे बदल, भूकंप, ज्वालामूखी यांचे स्वरुप समजून येईल.
04. स्पर्धा परीक्षेमध्ये जगाच्या भूगोलावर येणारे प्रश्न विद्यार्थ्यांना सोडविता येतील.

**अभ्यास घटक :**

**1. प्राकृतिक भूगोल : परिचय**

**भूगोल-** एक अभिक्षेत्रीय संबंधाचे विज्ञान- भूगोलाची व्याख्या , व्याप्ती व स्परुप- प्राकृतिक भूगोलाच्या शाखा : सुसंबध्द भूगोल, प्रादेशिक भूगोल, प्राकृतिक भूगोलाचे महत्व व मानवी जीवनावर परिणाम.

**2. पृथ्वीचे अंतरंग**

**पृथ्वीच्या उत्पत्तीसंबंधी परिकल्पना व सिध्दान्तः** लाप्लास यांची तेजोमेघ परिकल्पना, जीन्स आणि जेफरीज यांची भरती परिकल्पना.

**पृथ्वीचे अंतरंग : -** पृथ्वीचे अंतरंग व भूकंप- लहरींचा अन्योन्य संबंध.

**पृथ्वीच्या अंतरंगाचे थर :-** शिलावरण किंवा कवच, प्रावरण किंवा मध्यावरण, गाभा. (घनता व तापमान),

**पृथ्वीच्या अंतरंगासंबंधी निष्कर्ष -** भूंकप लहरीच्या अभ्यासावरुन अंतरंगाचे स्वरुप (पृथ्वीच्या केंद्रापासून).

**3. खंड व महासागर यांचे वितरण :**

भूखंड व महासागर यांच्या वितरणाची वैशिष्टये- क्षेत्रोन्नती आलेख.

**भूखंड अपवहन व भूपट्ट विवर्तनिकी :** वेगनरचा भूखंड अपवहन सिध्दान्त, भूपट्ट विवर्तनिका सिध्दान्त.

**4. भूकंप आणि ज्वालामुखी**

**भूकंप :** भूकंप निर्मितीची कारणे, भूकंप नाभी व भूकंप लहरींचे संचरण, भूकंप अभिलेख, भूकंपाचे जागतिक प्रदेश, भारतातील भूकंपाचे वितरण, भारतातील काही विनाशकारी भूकंप, भूकंपाचे परिणाम, हानी व फायदे.

**ज्वालामुखी :** ज्वालामुखल शंकू, ज्वालामुखी उद्रेकाची कारणे, ज्वालामुखी उद्रेकामधून बाहेर पडणारे पदार्थ, ज्वालामुखीचे प्रकार, ज्वालामुखीनिर्मित भूरूपे, ज्वालामुखीचे जागतिक वितरण, ज्वालामुखीचे परिणाम : तोटे व फायदे.

**5. भूरूपांचे वर्गीकरण :** प्रथम श्रेणी , द्वितिय श्रेणी, तृतीय श्रेणींची भूरूपे.

**पर्वत :** व्याख्या, वैशिष्टे, पर्वताचे वर्गीकरण.

**पठार :** व्याख्या, वैशिष्ट्ये, पठाराचे भौगोलिक स्थितीनुसार वर्गीकरण, उत्पत्तीनुसार पठाराचे वर्गीकरण,

**मैदान :** व्याख्या , वैशिष्ट्ये , मैदानाचे वर्गीकरण.

**6. भूरूपीय प्रक्रिया :**

**अपक्षय (विवरण) :** अपक्षयाचे प्रकार, कायिक अपक्षय, रासायनिक अपक्षय, जैविक अपक्षय, अपक्षयांचे परिणाम, अपक्षय, वहन, अपक्षरण व निक्षेपणाच्या प्रक्रिया (अनाच्छादन).

**नदी (वाहते पाणी), हिमनदी, वारा आणि सागरी लाटांद्वारा निर्मित प्रमुख भूरूपे :**

**नदीच्या अपक्षरण व निक्षेपणद्वारा निर्मित भूरूपे :-** नदीचे (वाहत्या पाण्याचे ) कार्य, नदीच्या अपक्षरण कार्याचे स्वरुप, अपक्षरण कार्यामुळे निर्माण होणारी भूरूपे, निक्षेपण कार्यामुळे निर्माण होणारी भूरूपे.

**हिमनदीच्या अपक्षरण व निक्षेपणद्वारा निर्मित भूरूपे :-** हिमनदी, हिमनदीच्या अपक्षरण कार्यामुळे निर्माण होणारी भूरूपे, हिंमनदीच्या निक्षेपण कार्यामुळे होणारी भूरूपे, हिमजलोढ निक्षेपणद्वारा निर्माण होणारी भूरूपे.

**वाऱ्याच्या अपक्षरण व निक्षेपणाद्वारा निर्मित भूरूपे :-** वाऱ्याच्या अपक्षरण कार्यामुळे निर्माण होणारी भूरूपे, वाऱ्याच्या निक्षेपण कार्यामुळे निर्माण होणारी भूरूपे.

**सागरी लाटांच्या अपक्षरण व निक्षेपणद्वारा निर्मित भूरूपे :-** सागरी लाटांच्या अपक्षरण कार्यामुळे निर्माण होणारी भूरूपे, सागरी लाटांचे निक्षेपणामुळे निर्माण होणारी भूरूपे.

*** संदर्भ ग्रंथ :**


1. जगाचा भूगोल - डी. आर. खुल्लर
2. प्राकृतिक भूगोलाची मूलतत्त्वे भाग - 1 - ए.बी. सवदी, कोळेकर
3. जगाचा भूगोल - माजीद हुसैन
4. प्राकृतिक भूगोल- डॉ. दाते
5. प्राकृतिक भूगोल- डॉ. मगर
6. प्राकृतिक भूगोल आणि भूरूपशास्त्र- श्रीकांत कार्लेकर
7. प्राकृतिक भूगोल- प्रा. दिलीप लांजेवार , प्रा. डॉ. विजय खराटे
8. प्राकृतिक भूगोल- डॉ. शंकर चौधरी, डॉ. मिश्रीलाल चव्हाण
9. जगाचा भूगोल- महेशकुमार बर्नवाल


...............

# Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded

## B.A. In Administrative Service (CBCS Pattern)

## Third Year ( Sem. V)

राज्यशास्त्र

मानवी हक्क

**Paper No. : AS 35**

**Credit : 03** **Periods : 50** **Marks: 75**

---

**अभ्यासक्रमाची उदिष्टये:**

01. भारतीय लोकशाहीमध्ये विद्यार्थ्यांना मानवी हक्काविषयी माहिती करुन देणे.
02. मानवी जिवनातील आंतराष्ट्रीय मानके, संविधानातील प्रतिबिंब, भारतातील मानवी हक्काची चळवळ, यांचा परीचय करुन देणे.
03. मानवी हक्कातील बालविकास, महिला विकास, युवकांचा विकास,आदिवासी विकास, वंचित वर्गाचा विकास, वयोवृध्द लोकांचा विकास, कामगार कल्याण, विकलांग व्यक्तीचे कल्याण, लोकांचे पुर्नवसन इत्यादी घटकाची माहिती करुन देणे.
04. स्पर्धा परीक्षेची तयारी करुन घेणे.

**निष्पत्ती :**

01. विद्यार्थ्यामध्ये मानवी हक्काविषयी जनजागृती निर्माण होईल.
02. मनवी हक्कातील बालविकास, महिला विकास, युवकांचा विकास अदिवासी विकास, वंचीत वर्गाचा विकास, वयोवृध्द लोकांचे कल्याण, कामगार कल्याण, विकलांग व्यक्तीचे कल्याण, लोकांचे पुनर्वसन, आंतरराष्ट्रीय व प्रादेशिक संघटना यासह संरक्षण मूल्य व नीतीशिलतेचा विद्यार्थ्यांना परिचय होईल.
03. मानवी हक्कातील सर्व संकल्पना विद्यार्थ्यांना समजतील.
04. विद्यार्थ्यांना दैनंदिन जीवनामध्ये समाजात व्यवहार करताना मानवी हक्का विषयी माहिती होईल.
05. विविध स्पर्धा परीक्षेंत येणारे मानवी हक्काविषयीचे प्रश्न सोडवता येतील.

अभ्यासक्रम घटक

**1. मानवी हक्काचे स्वरूप: जागतिक मानवी हक्क प्रतिज्ञापत्र ( युडीएचआर 1948 )** मानवी हक्काची आंतरराष्ट्रीय मानके , त्याचे भारताच्या संविधानातील प्रतिबिंब, भारतात मानवी हक्क राबविण्याची आणि त्याचे संरक्षण करण्याची यंत्रणा, भारतातील मानवी हक्क चळवळ, मानवी हक्कापासून वंचित असलेल्यांच्या समस्या जसे गरिबी निरक्षरता, बेरोजगारी सामाजिक सांस्कृतिक धार्मिक प्रथा, हिंसा, भ्रष्टाचार, दहशतवाद, कामगारांचे शोषण, हवालतीतील गुन्हेगारी इत्यादी, लोकशाहीत मानवी हक्क आणि मानवी सभ्यतेचे पालन करण्यासाठी प्रशिक्षण देण्याची गरज, जागतिकीरण आणि त्याचा विभिन्न क्षेत्रांवरील परिणाम, मानवी विकास निर्देशांक बालमृत्यू प्रमाण, लिंग गुणोत्तर.

**2. बाल विकास** - समस्या व प्रश्न, अर्भक मृत्युसंख्या, कुपोषण, बाल कामगार मुलांचे शिक्षण इत्यादी शासकीय धोरणे, कल्याण योजना आणि कार्यक्रम - आंतरराष्ट्रीय अभिकरणे, स्वयंसेवी संघटना, सामूहिक साधने यांची भूमिका, लोककल्याणामध्ये लोकांचा सहभाग.

**3. महिला विकास** - समस्या व प्रश्न, स्त्री- पुरुष असमानता, महिलांविरोधी हिंसाचार, स्त्री अर्भक हत्या / स्त्रीभ्रूण हत्या, महिलांचे सबलीकरण इत्यादी शासकीय धोरण विकास / कल्याण व सबलीकरण यासाठीच्या योजना व कार्यक्रम आंतरराष्ट्रीय संस्था, स्वयंसेवी संघटना यांची भूमिका आणि सामूहिक साधने , लोकविकासातील लोकांचा सहभाग.

**4. युवकांचा विकास** - समस्या व प्रश्न (बेरोजगारी असंतोष अंमली पदार्थांचे व्यसन इत्यादी) - शासकीय धोरण - विकास योजना व कार्यक्रम - आंतरराष्ट्रीय संस्था, स्वयंसेवी संघटना यांची भूमिका आणि सामूहिक साधने, लोकविकासातील लोकांचा सहभाग.

**5. आदिवासी विकास** - समस्या व प्रश्न ( कुपोषण अलिप्तता, एकात्मीकरण व विकास इत्यादी- आदिवासी चळवळ- शासकीय धोरण, कल्याण योजना व कार्यक्रम - आंतरराष्ट्रीय संस्था, स्वयंसेवी संघटना संस्था, स्वयंसेवा संघटना व साधन संपत्ती संघटित करुन कामी लावणे व सामूहिक सहभाग.

**6. सामाजिकदृष्ट्या वंचित वर्गाचा विकास** - अ.जा., अ.ज, वि.जा. / भ.ज, इतर मागासवर्ग इत्यादी) - समस्या व प्रश्न संधीतील असमानता इत्यादी शासकीय धोरण, कल्याण योजना व विकास कार्यक्रम, आंतरराष्ट्रीय संस्था, स्वयंसेवा संघटना व साधन संपत्ती संघटित करुन कामी लावणे व सामूहिक सहभाग, विकासविषयक कार्यक्रमांमध्ये त्यांच्या सेवांचे उपयोजन.

**7. वयोवृध्द लोकांचे कल्याण** - समस्या व प्रश्न - शासकीय धोरण- कल्याण योजना व कार्यक्रम, आंतरराष्ट्रीय संस्था, स्वंयेसेवी संघटना यांची भूमिका आणि वयोवृदांच्या विकासासाठी सामूहिक सहभाग, विकासविषयक कार्यक्रमांमध्ये त्यांच्या सेवांचे उपयोजन.

**8. कामगार कल्याण** - समस्या व प्रश्न - कामाची स्थिती, मजुरी, आरोग्य आणि संघटित व असंघटित क्षेत्राशी संबंधित समस्या, शासकीय धोरण, कल्याण योजना व कार्यक्रम - आंतरराष्ट्रीय संस्था, समाज व स्वयंसेवी संघटना.

**9. विकलांग व्यक्तीचे कल्याण** - समस्या व प्रश्न ( शैक्षणिक व रोजगार संधी यामधील असमानता इत्यादी ) शासकीय धोरण , कल्याण योजना व कार्यक्रम - रोजगार व पुनवर्सन यामधील आंतरराष्ट्रीय संस्था, स्वयंसेवी संघटना यांची भूमिका.

**10. लोकांचे पुनर्वसन** ( विकास प्रकल्प व नैसर्गिक आपत्ती यामुळे बाधित लोक ) - कार्यतंत्र धोरण व कार्यक्रम - कायदेविषयक तरतुदी - आर्थिक, सांस्कृतिक सामाजिक मानसशास्त्रीय इत्यादींसारख्या निरनिराळ्या पैलूंचा विचार.

**11. आंतरराष्ट्रीय व प्रादेशीक संघटना** - संयुक्त राष्ट्रे आणि तिची विशेषीकृत अभिकरणे- युएनसीटीएडी, युएनडीपी, आयसीजे, आयएलओ, युनिसेफ युनेस्को, युएनसीएचआर, इयु, ॲपेक, एशियन, ओपेक, ओपेक, ओएयु, सार्क, नाम, राष्ट्रकुल राष्ट्रे (कामनवेल्थ ऑफ नेशन्स ) आणि युरोपियन युनियन.

**12. ग्राहक संरक्षण** - विद्यमान अधिनियमाची ठळक वैशिष्ट्ये - ग्राहकाचे हक्क - ग्राहक विवाद व निवारण यंत्रणा, लवादांचे निरनिराळे प्रकार - उद्दिष्ट्ये, अधिकार, कार्ये, कार्यपध्दती, ग्राहक कल्याण निधी.

**13 मूल्ये व नीतीतत्त्वे** - कुटुंब धर्म, शिक्षण, प्रसारमाध्यमे इत्यादी यांसारख्या औपचारिक व अनौपचारिक संस्थामार्फत सामाजिक मानके, मूल्ये, नीतीतत्त्वे यांची जोपासना करणे.

D:\Som2\Dept./Adm Ser.TY syllabus 1.p65 8

**संदर्भ ग्रंथः**


1. भारतीय संविधान- व्हि.के. सिंह, शिलवंत सिंह
2. मानवी हक्क - तुकाराम जाधव/ महेश शिरापुरकर
3. समग्र मानवी हक्क- के सागर
4. मानव संसाधन विकास आणि मानवाधिकार - रंजन कोळंबे
5. भारत का संविधान- बसू दूर्गादास
6. भारतीय राज्यघटना आणि प्रशासन- रंजन कोळंबे
7. Our Parilment- Subhash Kashyap


......................

D:\Som2\Dept./Adm Ser.TY syllabus 1.p65 9

# Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded
## B.A. In Administrative Service (CBCS Pattern)
## Third Year ( Sem. V)
### अर्थशास्त्र
### सार्वजनिक आय-व्यय
### Paper No. : AS 36

**Credit : 03** | **Periods : 50** | **Marks: 75**

**अभ्यासक्रमाची उदिष्टये:**

01. भारताच्या सार्वजनिक वित्ताची माहिती करुन देणे.
02. सार्वजनिक धारेणाचा अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम समजून घेण्यास सक्षम करणे.
03. अर्थसंकल्पा बाबत माहिती करुन देणे व अर्थसंकल्पाच्या परिणामांचा अभ्यास करण्यास सक्षम बनविणे.
04. राजकोषिय व वित्तीय धोरणाचा परिणाम व उपाय याची जाणीव करुन देणे.
05. भारताच्या सार्वजनिक कर्जाची स्थिती लक्षात आणून देणे.
06. भारतीय कर रचना व कर आकारणीची माहिती करून देणे.

**निष्पत्ती :**

01. शासनाची अर्थव्यवस्थेतील भूमिका कळण्यास मदत होईल.
02. सार्वजनिक उत्पन्न व खर्चाचा परिणाम समजून येईल.
03. भांडवली व महसुली प्राप्ती व खर्चाचे मार्ग समजण्यास मदत होईल.
04. राजकोषिय धोरणाचा अर्थव्यवस्थेतील परिणाम कळण्यास विद्यार्थ्यांना सक्षम बनेल.
05. भारतीय कर प्रणालीची माहिती होते.
06. आर्थिक पाहणी अहवालाचा अभ्यास करण्यास उपयूक्त.

**अभ्यासक्रम घटक**

**1. सार्वजनिक आय**

1.1 भारतीय करप्रणाली

1.2 कारभाराचे विविध दृष्टिकोन, कारभार, कराचे परिणाम

1.3 कराची लवचिकता आणि तारतम्यता, कारभार पात्रता

**2. सार्वनिक अंदाजपत्रक**

2.1 अंदाजपत्रकाचा अर्थ आणि उदिष्ट्ये

2.2 अंदाजपत्रकाचे प्रकार

2.3 भारतातील केंद्र आणि राज्य सरकाचे अदांजपत्रक

**3. सार्वजनिक व्यय**

3.1 सार्वजनिक व्ययाचा अर्थ

3.2 सार्वजनिक व्ययाची परिकल्पना व वर्गीकरण

3.3 सार्वजनिक व्ययाची वैशिष्ट्ये आणि भूमिका

3.4 सार्वजनिक व्ययाचे परिणाम आणि मूल्यमापन

**4. सार्वजनिक कर्ज**

4.1 सार्वजनिक कर्जाचा अर्थ व स्त्रोत

4.2 सार्वजनिक कर्जाचा भार आणि व्यवस्थापन

4.3 सार्वजनिक कर्जाचे कारणे

4.4 सार्वजनिक कर्जाचे परिणाम

4.5 समांतर अर्थव्यवस्था

4.6 तुटीचा अर्थभरणा

**5. वित्तीय धोरण**

5.1 वित्तीय धोरणाचा अर्थ, उद्दिष्ट्ये

5.2 राजकोषीय धोरणाचा अर्थ, उद्दिष्ट्ये

5.3 कार्यात्मक वित्त

5.4 भारताचे वित्त धोरण

**संदर्भ ग्रंथ :**


| | |
|---|---|
| 1. सार्वजनिक आयव्यय - | एस. व्हीह. ढमढेरे व डॉ. संजय तुपे |
| 2. भारतीय अर्थव्यवस्था - | देसाई - भालेराव |
| 3. Public Finance- | V.B. Tyagi |
| 4. Public Finance - | Bhatia H.C. |
| 5. आधुनिक अर्थशास्त्राची मुलतत्त्वे- | रा.म. गोखले |
| 6. भारतातील सार्वजनिक आयव्यय- | डॉ. एस. व्ही. ढमढेरे |
| 7. राजस्व - | ओझकर सु. रा. |
| 8. सार्वजनिक आयव्यय- | डॉ. आर के दातीर व जी. जे. लोमटे |
| 9. सार्वजनिक आय व्यय - | डॉ. एल. के. पगार |
| 10. सार्वजनिक वित्त - | डॉ. संभाजी भाऊराव काळे |
| 11. सार्वजनिक आय-व्यय - | प्रा. डॉ. राजेंद्र रसाळ. |


......................

# Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded

## B.A. In Administrative Service (CBCS Pattern)

### Third Year ( Sem. V)

### इतिहास

### प्राचीन भारताचा इतिहास

**Paper No. : AS 37**

**Credit : 03** **Periods : 50** **Marks: 75**

---

**अभ्यासक्रमाची उदिष्टये:**

01. प्राचीन भारताच्या इतिहासाचा परिचय करून देणे.
02. प्रागैतिहासिक कालखंड सिंधुसंस्कृती, वैदिकसंस्कृती याचे आकलन करून देणे.
03. धार्मिक चळवळ, मौर्य साम्राज्य, मौर्योत्तर कालखंड, गुप्तसाम्राज्य, हर्षोत्तर कालखंडाची पार्श्वभुमी समजूण सांगणे.
04. राजपुतराज्ये, गोंड, शिलाहर घराणे यांची माहिती करून देणे.
05. स्पर्धा परीक्षेची तयारी करून घेणे.

**निष्पत्ती :**

01. प्राचीन भारताच्या इतिहासाचा परिचय होईल.
02. प्रागैतिहासिक कालखंड, सिंधूसंस्कृती, वैदिक संस्कृती याचे आकलण होईल.
03. धार्मिक चळवळ, मौर्यसाम्राज्य, मौर्योत्तर कालखंड, गुप्त साम्राज्य, हर्षोत्तर कालखंड याची पार्श्वभूमी समजूण येईल.
04. राजपुतराज्ये, गोंड शिलाहार घराणे याची माहिती होईल.
05. प्राचीन भारताच्या इतिहासाचे विविध स्पर्धा परीक्षेमध्ये येणारे प्रश्न सोडवता येतील.

**अभ्यासक्रम घटक :**

01. प्रागैतिहासिक कालीन भारतीय संस्कृती
    पुराश्मयुग, मध्याश्मयुग, नवाश्वमयुग, ताम्रपाशानयुग.
02. सिंधू संस्कृती
    हडप्पा, मोंहोंजोदडो संस्कृती, उदय, विकास, ऱ्हास
03. वैदिक व उत्तर वैदिक संस्कृती
04. धार्मिक चळवळ
    जैनधर्म, बौध्दधर्म, उदय, तत्त्वज्ञान, ऱ्हास.
05. मौर्य साम्राज्य
    मौर्यसाम्राज्याचा राजकीय इतिहास, विस्तार, ऱ्हास, प्रशासन सामाजिक, आर्थिक परिस्थिती, कला स्थापत्य.
06. मौर्योत्तर कालखंड
    शुंग, कण्व, चेदी, सातवाहण, संगमयुक, दक्षिणेतील राज्य
07. गुप्त व वर्धन साम्राज्य

D:\Som2\Dept./Adm Ser.TY syllabus 1.p65 12

08. वाकाटक, चालुक्य, पल्लव, पाल, प्रतिहार, राष्ट्रकूट घराणे
09. राजपुत राज्ये, गोंड, शिलाहार घराणे.

* संदर्भग्रंथ :


| | |
|---|---|
| 1. प्राचीन व मध्ययुगीन भारत - | प्राचार्य य.ना. कदम |
| 2. प्राचीन भारताचा इतिहास व संस्कृती- | डॉ. अनिल कठारे |
| 3. भारत का इतिहास- | रोमिला थापर |
| 4. एन्संड इंडिया- | वासंती फडके |
| 5. प्राचीन भारत का इतिहास- | महाजन विद्याधर |
| 6. प्राचीन भारत- | जोशी पी.जी. |
| 7. प्राचीन व मध्ययुगीन भारताचा इतिहास- | पा. ए.वाय. कोंडेकर |
| 8. प्राचीन भारताचा इतिहास- | र.ना.गायधनी |
| 9. भारत का इतिहास- | पी.एच. राव. |
| 10. Ancient India- | V.D. Mahajan |
| 11. Ancient Indian History & Culture- | B.G. Gokhale |


......................

# Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded

## B.A. In Administrative Service (CBCS Pattern)

## Third Year ( Sem. V)

### विज्ञान

### भौतिकशास्त्र भाग-1

**Paper No. : AS 38**

**Credit : 03** **Periods : 50** **Marks: 75**

**अभ्यासक्रमाची उदिष्टये:**

01. विद्यार्थ्यांना भौतिकशास्त्रातील मूलभूत संकल्पनाची, भौतिक राशींचे प्रमाणित एकके माहिती करुन देणे.
02. गतिविषयक समीकरणे मांडणे व त्या आधारे गणितीय उदाहरणे सोडविणे.
03. विस्थापन व वेग, अंतर , वेळ व वेग या आधारे सुत्रांची निर्मिती करणे.
04. गुरुत्वाकर्षणाचे नियम स्पष्ट करणे.
05. विद्युत धारा व विद्युत धारेचे गुणधर्म स्पष्ट करणे.
06. चुंबकत्वाचे गुणधर्म स्पष्ट करणे.
07. विद्युत धारा व चुंबकत्व यांचा परस्पर संबंध स्पष्ट करणे.
08. दैनंदिन जीवनात गतीविषयक नियम, विद्युत धारा व चुंबकत्व यांचे महत्व स्पष्ट करणे.

**निष्पत्ती :**

01. विद्यार्थ्यांना भौतिकशास्त्रातील मुलभूत संकल्पनाची, भौतिक राशींचे प्रमाणित एकके यांची ओळख होते.
02. आदिश राशी, सदिश राशी आणि विविध भौतिक राशींचे प्रमाणित एकके यांची माहिती होते.
03. गतिविषयक समिकरणे मांडता येतात आणि त्याद्वारे गणितीय उदाहरणे सोडविता येतात.
04. दैनंदिन जीवनामध्ये विविध भौतिक राशी आणि गतिविषयक समीकरणाचा वापर करता येतो.
05. विस्थापन, वेग, अंतर व वेळ यांच्या आधारे सूत्राची निर्मिती करता येते. व सूत्रांचा उपयोग करतो.
06. गुरुत्वाकर्षणाचे नियम जाणतो.
07. विद्युत धारेचे गुणधर्म जाणतो व या गुणधर्माचा दैनंदिन जीवनात उपयोग करता येतो.
08. चुंबकत्व व विद्युतधारा यांच्या परस्पर संबंधाचा उपयोग दैनंदिन जीवनामध्ये प्रभाविपणे करता येतो.

**अभ्यासक्रम घटक**

1. भौतिकशास्त्र : ओळख्र व मूलभूत संकल्पना
2. मापन - एकके, आदिश राशी, सदिश राशी, आंतराष्ट्रीय प्रमाणित एकके.
3. गतिविषयक नियम व समिकरणे
4. गुरुत्वअकर्षण
5. विद्युत धारा
6. चुंबकत्त्व

D:\Som2\Dept./Adm Ser.TY syllabus 1.p65 14

**संदर्भ ग्रंथ :**


1. सामान्य विज्ञान भाग 2, युनिक ॲकॅडमी, पुणे.- गोरे चंद्रकांत
2. सामान्य विज्ञान, व्हिजन ॲकॅडमी, पुणे. - वैश्यपायन एस.वाय.
3. संपूर्ण विज्ञान, कविता पब्लिकेशन, औरंगाबाद- पवार राम
4. संपूर्ण विज्ञान, दिपस्तंभ प्रकाशन, जळगाव - पाटील जयदीप
5. संपूर्ण विज्ञान तंत्रज्ञान, जिज्ञासा प्रकाशन, पुणे- धात्रक विनया
6. सामान्य विज्ञान, ज्ञानदिप ॲकॅडमी, पुणे- भस्के सचिन
7. सामान्य विज्ञान, लुसेंट पब्लिकेशन, पटना- कुमार संजीव
8. Fastract Science, ओंकार पब्लिकेशन, औरंगाबाद- वसे सतिश
9. कॉम्पिटिट्व्ह सायन्स, विनर्स पब्लिकेशन, औरंगाबाद- कोलते अनिल अप्पाराव
10. विज्ञान तंत्रज्ञान आणि विकास, भगीरथ प्रकाशन, पुणे- कोळंबे रंजन
11. संपूर्ण सामान्य ज्ञान, अनिरुध्द पब्लिकेशन हाऊस, पुणे- भालेराव कविता
12. महाराष्ट्रराज्य पाठयपुस्तक निर्मिती मंडळ, पुणे- इ. 8 वी, 9 वी व 10 वी विज्ञान.
13. इ. 8 वी, 9 वी व 10 वी विज्ञान पाठ्यपुस्तक- NCERT, दिल्ली
14. भौतिकशास्त्र - इ. 11 वी व 12 वी विज्ञान (NCERT व महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ, पुणे)


..................

# Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded

## B.A. In Administrative Service (CBCS Pattern)

## Third Year ( Sem. VI)

भूगोल

जगाचा भूगोल भाग -2

**Paper No. : AS 39**

**Credit : 03** | **Periods : 50** | **Marks: 75**

**अभ्यासक्रमाची उदिष्टये:**

01. प्राकृतिक भूगोलाची माहिती करुन देणे.
02. पृथ्वीतलावरील हवामानाची माहिती करुन देणे.
03. पृथ्वीवरील सागरशास्त्राची माहिती करुन देणे.
04. भूगोल विषयाच्या संदर्भात विद्यार्थ्यांची स्पर्धा परीक्षेची तयारी करुन घेणे.

**निष्पत्ती :**

01. जगाच्या प्राकृतिक भूगोलाची माहिती होईल.
02. पृथ्वीतलावरील हवामान शास्त्रातील मुलभूत घटकांची माहिती होईल.
03. पृथ्वीतलावरील सागरशास्त्राची माहिती होईल.
04. पर्यावरण संकल्पना व समस्या याची माहिती होईल.
05. स्पर्धा परीक्षेत जगाच्या भूगोला विषयीचे प्रश्न सोडविण्यास मदत होईल.

**अभ्यासक्रम घटक**

**विभाग अ**

**पर्यावरणीय भूगोल -** परिस्थितिविज्ञान व परिस्थितिक असमतोल - प्रदूषण व हरितगृह परिणाम, हरितगृह परिणामातील कार्बन डाय ऑक्साईडची व मिथेनची भूमिका, जागतिक तापमानातील वाढ, वैवविविधतेतील घट आणि वनांचा ऱ्हास, पर्यावरणीय संरक्षणाबाबात कायदे व पर्यावरणीय प्रभावाचे परीक्षण क्योटो प्रोटोकॉल व कार्बन क्रेडिटस, शहरी कचरा व्यवस्थापन सागरी संरक्षित क्षेत्र एक व सागरी संरक्षित क्षेत्र दोन.

**विभाग ब**

**महासागर :**

जलचक्र / जलस्थित्यंतर संकल्पना, जलस्थितयंतर चक्रामध्ये विविध भागांतील जलांचे वितरण.

**सागरतळ रचना :** भूखंड / समुद्रबूड जमिन, खंडान्त उतार, सागर द्रोणी, अगाध सागरी तळ, सागरी पर्वत व सागरी पठार, सागरी कटक व चढ, सागरी डोह व सागरी गर्ता.

**महासागरातील प्रमुख भूरूपे :** अटलांटिक महासागराची तळरचना, पॅसिफिक महासागराची तळरचना, हिंदी महासागराची तळरचना

**सागरजलाचे तापमान :** सागरजलाच्या तापमानाचे क्षितज-समांतर वितरण, सांगरजलाच्या क्षारतेचे वितरण.

D:\Som2\Dept./Adm Ser.TY syllabus 1.p65 16

**सागरजलाच्या हालचाली :-** सागरी लाटा, समुद्र प्रवाह :- समुद्रप्रवाहाच्या निर्मितीची कारणे समुद्रप्रवाहाचे सर्वसाधारण चक्र, अटलांटिक महासागरातील समुद्रप्रवाह, पॅसिफिक सर्वसाधारण चक्र, हिंदी महासागरातील समुद्रप्रवाह, समुद्रप्रवाहाचे परिणाम.

**भरती ओहोटी :-** व्याख्या, भरती-ओहोटीच्या निर्मितीची कारणे, भरती ओहोटीचे प्रकार, भरती -ओहोटीचे परिणाम, महासागराचे आर्थिक महत्त्व.

**विभाग क :**

**हवामानशास्त्र :**

वातावरण रचना व संरचना, औष्णिक संतुलन,हवामानाचे घटक, तापमान, वायुदाब, गृहीय वारे, स्थानिक वारे, मान्सुन वायुराशी, आवर्त-प्रत्यावर्त, चक्रीवादळे, हवामान प्रदेश, भारतीय मान्सुनचे तंत्र आणि हवामान शास्त्राचे वर्गीकरण ( कोपेन, थॉर्नवेट आणि त्रिवार्था)

*** संदर्भ ग्रंथ :**


1. जगाचा भूगोल - डी. आर. खुल्लर
2. प्राकृतिक भूगोलाची मूलतत्त्वे भाग - 1 - ए.बी. सवदी, कोळेकर
3. जगाचा भूगोल - माजीद हुसैन
4. प्राकृतिक भूगोल- डॉ. दाते
5. प्राकृतिक भूगोल- डॉ. मगर
6. प्राकृतिक भूगोल आणि भूरूपशास्त्र- श्रीकांत कार्लेकर
7. प्राकृतिक भूगोल- प्रा. दिलीप लांजेवार , प्रा. डॉ. विजय खराटे
8. प्राकृतिक भूगोल- डॉ. शंकर चौधरी, डॉ. मिश्रीलाल चव्हाण
9. जगाचा भूगोल- महेशकुमार बर्नवाल
10. हवामानशास्त्र - विठ्ठल घारपुरे


..................

D:\Som2\Dept./Adm Ser.TY syllabus 1.p65 17

# Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded
## B.A. In Administrative Service (CBCS Pattern)
## Third Year ( Sem. VI)
### राज्यशास्त्र
### मानवी संसाधन
### Paper No. : AS 40

**Credit : 03** **Periods : 50** **Marks: 75**

**अभ्यासक्रमाची उदिष्टये:**

01. विद्यार्थ्यांमध्ये मानव संसाधन विकासाविषयी अभिरुची वाढविणे.
02. मानव संसाधन विकासातील लोकसंख्या सद्यस्थिती भारतातील बेरोजगारी इ. समस्याविषयी माहिती करुन देणे.
03. भारत सरकार मानव संसाधन विकासासाठी राबवित असणाऱ्या योजना विषयी माहिती करुन देणे.
04. मानव संसाधन विकासासाठी आवश्यक असणारे विविध दृष्टिकोन याची माहित करुन देणे.

**निष्पत्ती :**

01. विद्यार्थ्यांमध्ये मानव संसाधन विकासाविषयी माहिती होईल.
02. मानव संसाधन विकासातील भारतीय लोकसंख्या, सद्यस्थिती व विविध समस्या यांची विद्यार्थ्यांना जाणिव होईल.
03. मानव संसाधन विकासासाठी भारत सरकार कडून राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती होईल.
04. मानव संसाधन विकासाविषयीचे प्रश्न स्पर्धा परीक्षेत विद्यार्थी सहजपणे सोडवितील.

**अभ्यासक्रम घटक**

**1.भारतातील मानव संसाधन विकास -** भारतातील लोकसंख्येची सद्यस्थिती, संख्यात्मक स्वरुप, आकारमान आणि वाढ, लिंग, वय, नागरी आणि ग्रामीण) आणि गुणात्मक स्वरुप (शिक्षण व आरोग्य विषयक काळजी), लोकसंख्याविषयक धोरण आणि 2050 पर्यंतच्या योजना, आधुनिक समाजातील मानव संसाधन नियोजनाचे महत्त्व आणि गरज, मानव संसाधन योजनामध्ये अंतर्भूत असलेले घटक आणि कारणीभूत गोष्टी, भारतातील बेरोजगारीचे स्वरुप, प्रकार आणि समस्या. भारतातील सेवा योजनांचा कल , विभिन्न विभागातील व क्षेत्रातील कुशल कामगारांची मागणी , दर मनुष्यबळ विकासाकरिता कार्यरत असलेल्या शासकीय आणि स्वयंसेवी संघटना उदा. एनसीईआरटी, एनआयईपीए, विद्यापीठ अनुदान आयोग, मुक्त विद्यापीठे, आययएमसी इत्यादी. मानव संसाधन विकासाशी संबंधीत समस्या आणि बाबी, शासनाचे नोकरी विषयक धोरण आणि न्यू बेरोजगारी कमी करण्यासाठी विविध योजना.

**2. शिक्षण -** मानव संसाधन विकासाचे आणि सामाजिक बदलाचे साधन म्हणून शिक्षणाचा विचार भारतातील (पूर्व प्राथमिक ते उच्च शिक्षण) शिक्षण प्रणाली (शिक्षणाचे सार्वत्रिकरण) शिक्षणाचे व्यावसायीकरण, दर्जावाढ, गळतीचे प्रमाण इत्यादी) समस्या आणि प्रश्न, मुलींकरिता शिक्षण सामाजिकदृष्ट्या व आर्थिकदृष्ट्या गरीब वर्ग अधू, अल्पसंख्यांक, कौशल्य शोध इत्यादी.

**3. व्यावसायिक शिक्षण -** मानव संसाधन म्हणून व्यावसायिक शिक्षणाचा विचार, व्यावसायिक तंत्र

शिक्षण भारतातील विशेष महाराष्ट्रातील सद्यस्थिती, शिक्षणप्रणाली व प्रशिक्षण  शासकीय धोरणे, योजना व कार्यक्रम - समस्या, प्रश्न व त्यावर मात करण्यासाठी प्रयत्न व्यावसायिक आणि तंत्र, शिक्षण भारतातील विशेषत महाराष्ट्रातील सद्यस्थिती शिक्षणप्रणाली व प्रशिक्षण शासकीय धोरणे, योजना व कार्यक्रम समस्या प्रश्न व त्यावर मात करण्यासाड़ी प्रयत्न व्यावसायिक आणि तंत्र शिक्षणाचा प्रसार, विनिमय करणाऱ्या आाणि अधिस्वीकृती देणाऱ्या संस्था.

**4. मानव संसाधन विकासाचे साधन म्हणून व्यावसायिक शिक्षणाचा विचार,** जीवनविषयक आकडेवारी  जागतिक आरोग्य संघटना- उद्देश, रचना कार्ये व कार्यक्रम, भारतामध्ये शासनाची आरोग्य विषयक धोरणे, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान.

**5 ग्रामीण विकास -** पंचायत राज व्यवस्थेला अधिकार प्रदान करणे, ग्राम पंचायत आणि ग्रामविकासातील तिची भूमिका जमीन सुधारणा व विकास ग्रामविकासातील सहकारी संस्थांची भूमिका, ग्रहनिर्माण व दळणवळण, राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना.

*** संदर्भ ग्रंथ :**

01. भारताती मानव संसाधन विकास - अमोल लक्ष्मण घोडके
02. मानव संसाधन विकास आणि मानवाधिकार- रंजन कोळंबे
03. मानव संसाधन विकास आणि मानवी हक्क - मिना चौधरी
04. मानव संसाधन विकास आणि मानवी हक्क - नितीन देशपांडे.
05. मानव संसाधन विकास - यु. सी. गुप्ता

................

D:\Som2\Dept./Adm Ser.TY syllabus 1.p65 19

# Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded

## B.A. In Administrative Service (CBCS Pattern)

## Third Year ( Sem. VI)

अर्थशास्त्र

औद्योगिक अर्थशास्त्र

**Paper No. : AS 41**

**Credit : 03** **Periods : 50** **Marks: 75**

**अभ्यासक्रमाची उदिष्टये:**

01. विद्यार्थ्यांना औद्योगिक अर्थशास्त्राची ओळख करुन देणे.
02. भारतातील औद्योगिकीकरणाची जाणीव करून देणे.
03. आर्थिक विकासात औद्योगिकरणाची भूमिका समाजावून देणे.
04. उद्योगिक समस्याची उकल करण्यास सक्षम करणे.
05. शासनाच्या औद्यागिक धोरणाची माहिती करून देणे.
06. औद्योगिक बदला बाबत जागृती निर्माण करणे.

**निष्पत्ती :**

01. विद्यार्थ्यांना औद्योगिक प्रगतीची जाणीव होईल.
02. शासकीय औद्योगिक धोरणाचा उद्योगावरिल परिणाम लक्षात येईल.
03. विद्यार्थ्यांना औद्योगिकीकरणाच्या समस्येची जाणिव होईल.
04. औद्योगिक अर्थशास्त्रातील संकल्पना लक्षात येतिल.
05. औद्योगिकरणा अंतर्गत देशाच्या विकासाची विद्यार्थ्यांना जानिव होईल.
06. भारतीय अर्थव्यवस्थेतील औद्योगिकीकरणाचे महत्त्व लक्षात येईल.

**अभ्यासक्रम घटक**

**1. उद्योगाचे स्थानीकरण**

1.1 उद्योगाच्या स्थानीयकरण अर्थ

1.2 स्थानीकरणावर प्रभाव टाकणारे घटक

1.3 उद्योगांच्या विखुरीकरणाबाबत भारत सरकारचे धोरण

1.4 उद्योगांच्या विखुरीकरणाबाबत महाराष्ट्र शासनाचे धोरण

1.5 औद्योगिक स्थानीयकरणाचे सिध्दांत - आल्फ्रेड वेबर, सार्जन्ट फ्लोरेन्स

**2. औद्योगिकीकरण आणि आर्थिक विकास**

2.1 औद्योगिकीकरणाचा अर्थ

2.2 औद्योगिकीकरणास सहाय्यक घटक व महत्व

2.3 भारतातील लघु व कृषी आधारित उद्योग

2.4 भारतातील आजारी उद्योग

**3. भारतातील प्रमुख उद्योग**

D:\Som2\Dept./Adm Ser.TY syllabus 1.p65 20

3.1सुती कापड उद्योग

3.2 साखर उद्योग

3.3 लोखंड व पोलाद

3.4 खनिज तेल रसायन उद्योग

3.5 अभियांत्रिकी वस्तू उद्योग

**4. औद्योगिक वित्त**

अ) भारतातील विविध वित्त संस्था

4.1 भारतातील औद्योगिक वित्त निगम

4.2 राज्य वित्तीय निगम

4.3 भारतीय औद्योगिक पत व गुंतवणुक निगम

4.4 भारतीय औद्योगिक विकास बँक

ब) राज्य व प्रादेशिक वित्त आणि विकास संस्था

4.4 महाराष्ट्र राज्य औद्योगिक व गुंतवणूक निगम

4.5 महाराष्ट्र राज्य लघु उद्योग विकास निगम

4.6 जिल्हा उद्योग केंद्र

4.7 महाराष्ट्र राज्य वित्त निगम

4.8 मराठवाडा विकास महामंडळ निगम

**5. भारतातील औद्योगिक धोरण**

5.1 औद्योगिक धोरणाची-संकल्पना

5.2 स्वातंत्र्यापूर्वी भारताचा औद्योगिक विकास

5.3 स्वातंत्र्यानंतरची औद्योगिक नीती - 1948, 1956, 1977, 1980, 1991

5.4 सेझ ची संकल्पना

5.5 प्रादेशिक असमतोल

*** संदर्भ ग्रंथ :**


| | |
|---|---|
| 1. औद्योगिक अर्थशास्त्र - | डॉ. एस.सी. जैन |
| 2. औद्योगिक अर्थशास्त्र - | बी.सी. सिन्हा |
| 3. औद्योगिक अर्थशास्त्र - | डॉ. डी.जी. उशीर<br>डॉ. आर. डी. दरेकर<br>व्हि.जी. वावळे |
| 4. Industial Economics | Dr. Mangla Tangle |
| 5. औद्योगिक अर्थशास्त्र- | प्रा. राखेलकर (डॉ. दामाजी) |
| 6. औद्योगिक अर्थशास्त्र - | डॉ. राजेंद्र अ रसाळ |
| 7. Industrial Economic | Dr. Shivbhushan Gupta. |
| 8. भारतीय अर्थव्यवस्था - | दत्त आणि सुंदरम |
| 9. भारतीय औद्योगिक अर्थव्यवस्था - | देसाई स.श्री. |
| 10. औद्योगिक अर्थशास्त्र - | रायखेलकर व डांगे. |
| 11. अर्थव्यवस्था - | अभिजित राठोड. |


..................

# Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded

## B.A. In Administrative Service (CBCS Pattern)

## Third Year ( Sem. VI)

### इतिहास

### महाराष्ट्राचा इतिहास

### Paper No. : AS 42

**Credit : 03** **Periods : 50** **Marks: 75**

---

**अभ्यासक्रमाची उदिष्टये:**

01. महाराष्ट्राच्या इतिहासाचा परिचय करुन देणे.
02. प्राचीन, मध्ययुगीन महाराष्ट्र, ब्रिटीश सत्तेची स्थापना, स्वरुप, 1857चा उठाव, सामाजिक, धार्मिक संघटना याची पार्श्वभूमी समजून सांगणे.
03. महाराष्ट्रातील राष्ट्रीय चळवळ, क्रांतीकारी चळवळ, समाजसुधारक इ. चे आकलन करुन देणे.
04. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारसा याची माहिती करुन देणे.
05. स्पर्धा परीक्षेची तयारी करुन घेणे.

**निष्पत्ती :**

01. महाराष्ट्राच्या इतिहासाचा परिचय होईल.
02. प्राचीन, मध्ययुगीन महाराष्ट्र ब्रिटीश सत्तेची स्थापना, स्वरुप 1857चा उठाव, सामाजिक, धार्मिक संघटना याची पार्श्वभूमी समजेल.
03. महाराष्ट्रातील राष्ट्रीय चळवळ, क्रांतीकारी चळवळ, समाजसुधारक इ. चे आकलन होईल.
04. महाराष्ट्राचा सांस्कृतिक वारसा याची माहिती होईल.
05. महाराष्ट्राच्या इतिहासाचे विविध स्पर्धापरीक्षेमध्ये येणारे प्रश्न सोडवता येतील.

अभ्यास घटक

1. प्राचीन व मध्ययुगीन महाराष्ट्र
2. महाराष्ट्रात ब्रिटीश सत्तेची स्थापना
3. ब्रिटीश राजवटीचे प्रारंभीचे महाराष्ट्रातील स्वरुप, प्रशासन, शिक्षण, वृत्तपत्रे, ख्रिश्चन मिशनऱ्याचे कार्य, महसूलप्रणाली, रेल्वे, टपाल, तार इत्यादी.
4. 1857 चा उठाव व महाराष्ट्र
5. महाराष्ट्रातील सामाजिक व धार्मिक संघटना
6. महाराष्ट्रातील राष्ट्रीय चळवळ, असहकार चळवळ, सविनय कायदेभंग, छोडोभारत, संयुक्त महाराष्ट्र.
7. महाराष्ट्रातील क्रांतीकारी चळवळी.
8. महाराष्ट्रातील निवडक समाजसुधारक: त्यांची विचारप्रणाली व कार्ये - गोपाळ गणेश आगरकर, महात्मा फुले, मा.गो. रानडे, प्रबोधनकार ठाकरे, महर्षि कर्वे, राजर्षि शाहू महाराज, महर्षि विठ्ठल शिंदे, बाबासाहेब आंबेडकर, लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, विनोबा भावे, विनायक दा. सावरकर, अण्णाभाऊ साठे, क्रांतीवीर नाना पाटील, लहुजी साळवे, कर्मवीर भाऊराव पाटील.
9. महाराष्ट्राचा सांस्कृतिक वारसा - प्राचीन ते आधुनिक - प्रायोगिक कला - नृत्य, नाटक, चित्रपट,

संगीत व लोककला लावणी ,तमाशा ,पोवाडा, भारुड व इतर लोकनृत्ये दृश्य कला वास्तु रचना, चित्रपट व वास्तुशिल्प आणि उत्सव महाराष्ट्राच्या सामाजिक व मानसिक विकासातील वाड़मयाचा प्रभाव भक्ती वाड़मय दलित वाड़मय नागरी व ग्रामीण वाड़मय.

*** संदर्भ ग्रंथ :**


1. महाराष्ट्राचा इतिहास- डॉ. अनिल कठारे
2. आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास- डॉ. एस.एस. गाठाळ
3. आधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास- प्रा. दिनेश मोरे.
4. शिवकालीन महाराष्ट्रातील स्थिती- घोडके राजश्री.
5. महाराष्ट्रातील स्वातंत्र्य लढे- बोबरेकर वि.गो.
6. विसाव्या शतकातील महाराष्ट्र- य.दि. फडके
7. उपेक्षित महाराष्ट्राचा मानकरी - सरदार ग.ब.


...............

D:\Som2\Dept.\Adm Ser.TY syllabus 1.p65 23

# Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded

## B.A. In Administrative Service (CBCS Pattern)

## Third Year ( Sem. VI)

विज्ञान

विज्ञान विकास (तंत्रज्ञान, जैवतंत्रज्ञान व आपत्ती व्यवस्थापन)

**Paper No. : AS 43**

**Credit : 03** **Periods : 50** **Marks: 75**

**अभ्यासक्रमाची उदिष्टये:**

01. पारंपारीक व अपारंपारीक ऊर्जासाधनांचा परीचय करुन देणे.
02. आधुनिक समाजातील संगणकाची भूमिका, माहितीतंत्रज्ञान, नेटवर्क, वेब तंत्रज्ञान इ. ची माहिती करुन देणे.
03. अवकाश तंत्रज्ञानाविषयी माहिती करुन देणे.
04. कृषि पैदास, आरोग्य, औषध निर्माण, अन्न तंत्रज्ञान, ऊर्जा निर्मिती इ. क्षेत्रातील जैवतंत्रज्ञाना विषयी माहिती करुन देणे.
05. भारताचे आण्विक धोरण या विषयी माहिती करुन देणे.
06. विविध स्पर्धा परीक्षेची तयारी करुन घेणे.

**निष्पत्ती :**

01. पारंपरिक व अपारंपरिक ऊर्जासाधनांचा परिचय होईल.
02. आधुनिक समाजातील संगणकाची भूमिका, माहितीतंत्रज्ञान, नेटवर्क, वेब तंत्रज्ञानाची माहिती विद्यार्थ्यांना होईल.
03. अवकाश तंत्रज्ञानाविषयी माहिती होईल.
04. कृषि पैदास, आरोग्य, औषध निर्माण, अन्न तंत्रज्ञान, ऊर्जा निर्मिती इ. क्षेत्रात जैवतंत्रज्ञानाचा उपयोग करता येईल.
05. भारताचे आण्विक धोरण या विषयी माहिती होईल.
06. विविध स्पर्धा परीक्षेमध्ये विज्ञान, तंत्रज्ञान व जैवतंत्रज्ञान या विषयीचे प्रश्न सोडविता येतील.

**अभ्यासक्रम घटक**

**विज्ञान व तंत्रज्ञान विकास**

**1. ऊर्जा -** पारंपारिक व अपारंपारिक उर्जा साधने - सौर वारा, जीवन व वस्तुमान, भूऔष्णिक व इतर नवीकरणयोग्य ऊर्जा साधनांची संभाव्यता, और साधने म्हणजेच सौर कुकर, पाणी तापक इ. नव्याने सुरुवात, जैववायू , (बायोगॅस) तत्वे व प्रक्रिया ऊर्जा संकटाची समस्या, शासकीय धोरणे आणि वीज निर्मितीसाठी कार्यक्रम, अणुशक्ती कार्यक्रम औष्णिक वीज कार्यक्रम जलविद्युत कार्यक्रम वीज वितरण व राष्ट्रीय विद्युत पुरवठा ऊर्जा सुरक्षा संशोधन व विकास यात गुंतलेली अभिकरणे व संस्था.

**2. संगणक व माहिती तंत्रज्ञान -** आधुनिक समाजातील संगणकाची भूमिका आणि माहितीची देवाण - घेवाण नेटवर्किं व वेबतंत्रज्ञान यांसारख्या जीवनाच्या विविध क्षेत्रामधील त्याचे उपयोजन सायबर गुन्हे व त्यावरील प्रतिबंध विविध सेवांमधील माहिती तंत्रज्ञानाचा वापर मिडीया लॅब आशिया विद्या वाहिनी ज्ञान

वाहिनी, कम्युनिटी माहिती केंद्र इ. सारखे शासकीय माहिती तंत्रज्ञान उद्योगातील महत्वाचे प्रश्न त्याचे भवितव्य.

**3. अवकाश तंत्रज्ञान -** भारतीय कार्यक्रम, दूरसंचार, शिक्षण, प्रसारण, हवामान अंदाज जीपीएस, आपत्ती इशारा याकरिता भारतीय कृत्रिक उपग्रह भारतीय क्षेपणास्त्र कार्यक्रम इ. सुदूर संवेदना भौगोलिक माहिती यंत्रणा जीआयएस आणि हवामान अंदाज, आपत्ती इशारा यामधील तिचे उपयोजन, जल मृद, खनिज संपत्ती, विकास, कृषि व मत्सयविकास, नागरी नियोजन परिस्थितीकी अभ्यासक्रम भौगोलिक यंत्रणा व भौगोलिक माहिती यंत्रणा.

**4 जैव तंत्रज्ञान :** कृषि, औद्योगिक विकास व रोजगार निर्मितीव्दारे मानवी जीवन व राष्ट्रीय अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी संभाव्य शक्यता, नैसर्गिक साधनसंपत्ती विकासाचे आवश्यक व महत्वाचे साधन म्हणून जैवतंत्रज्ञान उपयोजनाची क्षेत्रे - कृषि, पशु पैदास व पशुवैद्यकीय आरोग्य केंद्र, औषध निर्माणविद्या, मानवी आरोग्य केंद्र, अन्न तंत्रज्ञान, ऊर्जा निर्मिती, पर्यावरण संरक्षण इ. देशातील जैवतंत्रज्ञानाबाबत प्रचालन, नियमन व विकास यांमधील शासनाची भूमिका व प्रयत्न, जैवतंत्रज्ञानाच्या विकासाशी संबंधित नैतिक, सामाजिक व कायदेशीर प्रश्न, जैवतंत्रज्ञान विकासाचे शक्य ते प्रतिकूल परिणाम, बियाणे तंत्रज्ञान, त्याचे महत्व, बियाणांची गुणवत्ता, बियाणांचे विविध प्रकार आणि त्यांचे बियाणे उत्पादन व प्रक्रिया तंत्रे, बी. टी. कापूस, बी. टी. वांगे इ.

**5 भारताचे आण्विक धोरण :** ठळक वैशिष्ट्ये, ऊर्जेचा स्त्रोत म्हणून अणुऊर्जा आणि स्वच्छ ऊर्जा म्हणून त्याचे महत्व, आण्विक टाकाऊ कचऱ्याची समस्या, भारतातील औष्णिक वीज निर्मिती, एकूण वीज निर्मितीमधील त्याचे अंशदान, आण्विक चाचणी निर्धारके : पोखरण एक (1974) आणि पोखरण दोन (1998) न्युंक्लिअर नॉन- प्रोलिफरेशन ट्रिएटी आणि कॉप्रेहेंसिव टेस्ट बॅन ट्रिएटी यांसारख्या आण्विक धोरणाबाबतचा अलिकडला कल, 2009 चा इंडो - युएस न्युक्लिअर करार.

**6 आपत्ती व्यवस्थापन :** आपत्तीची व्याख्या, स्वरुप, प्रकार व वर्गीकरण, नैसर्गिक धोके, कारणीभूत घटक व ते सौम्य करणारी उपाययोजना. पूर, भूकंप, त्सुनामी दरड कोसळणे इ. सौम्य करणाऱ्या उपाययोजनांवर परिणाम करणारे घटक, किल्लारी (1993), भूज (2001), सिक्कीम - नेपाळ (2011) भूकंप तसेच बंदा आले (2004) (सुमात्रा), फुफुशिमा (2011) (जपान) भूकंप व त्सुनामी यांसारख्या मोठ्या भूकंप व त्सुनामी प्रकरणांचा अभ्यास, महाराष्ट्र 2005 चा मुंबईतील पूर, डिसेंबर 1993, जून 2006, नोव्हेंबर 2009, जुलै 2011 चे बॉम्ब स्फोट आणि अतिरेक्यांचा हल्ला, त्यांचा परिणाम.

*** संदर्भ ग्रंथ :**


1. Science & Technology - Ashok Kumr Singh.
2. Science & Technology - Neeraj Nachiketa
3. Science & Technology - C B P Srivastava
4. General Science & Technology - Satya Prakash , J. Kumar
5. Science & Technology- Ravi I. P. & A Grahari.
6. सामान्य विज्ञान एवं तकनीकी - उपेन्द्र अनमोल.
7. विज्ञान और प्रौद्योगिकी - रवि पी. अग्रहरि
8. सामान्य विज्ञान- दृष्टि.
9. आपत्ती व्यवस्थापन व अशासकीय संघटनांचे व्यवस्थापन- डॉ. शिंदे प्रकाश, डॉ. मोहमद हनिफ शेख.
10. आपत्ती व्यवस्थापन व प्रशासन- डॉ. प्रीती पोहेकर
11. Disaster Management - R. Subramanian




.........................

# Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded

## B.A. In Administrative Service (CBCS Pattern)

## Third Year ( Sem. VI)

### विज्ञान

### भौतिकशास्त्र भाग -2

### Paper No. : AS 44

**Credit : 03** **Periods : 50** **Marks: 75**

**अभ्यासक्रमाची उदिष्टये:**

01. ध्वनी विषयक विविध घटक इ. विषयीची माहिती विद्यार्थ्यांना देणे.
02. उष्णता, उष्णतेचे एकक, उष्णतेचे वहन इ. घटकाविषयी माहिती करुन देणे.
03. प्रकाश, प्राकशाचे वहन तसेच दैनंदिन जिवनात प्रकाशाचे महत्त्व यांची माहिती करुन देणे.
04. आरसा, भिंगे, भिंगाचे प्रकार, ऊर्जा, ऊर्जेचे प्रकार, दाब, बल व त्याचे कार्य इ. विषयीची माहिती करुन देणे.
05. आधुनिक भौतिकशास्त्राचे माहिती करुन देणे.

**निष्पत्ती :**

01. ध्वनी व ध्वनी विषयक घटक इ. ची माहिती विद्यार्थ्यांना होईल.
02. उष्णता व उष्णतेचे वहन कसे होते हे विद्यार्थ्यांना समजेल.
03. प्रकाश व प्रकाशाचे बहन व दैनदिन जिवनात त्याचा उपयोग आपण कसा करतो या विषयी जाणिव होईल.
04. भौतिकशास्त्रातील विविध संकल्पना उदा. आरसा , भिंगे, भिंगाचे प्रकार, ऊर्जा, दाब व त्याचे कार्य या विषयी माहिती होईल.
05. आधुनिक भौतिकशास्त्र आण्विक भौतिकशास्त्र इ. चे महत्त्व लक्षात येईल.

**अभ्यासक्रम घटक**

1. ध्वनी
2. उष्णता
3. प्रकाश
4. भिंग व आरसे
5. उर्जा व उर्जेचे प्रकार
6. दाब, बल व कार्य
7. आधुनिक व अन्विक भौतिकशास्त्र

D:\Som2\Dept./Adm Ser.TY syllabus 1.p65 26

**संदर्भ ग्रंथ :**


1. सामान्य विज्ञान भाग 2, युनिक ॲकॅडमी, पुणे.- गोरे चंद्रकांत
2. सामान्य विज्ञान, व्हिजन ॲकॅडमी, पुणे. - वैश्यपायन एस.वाय.
3. संपूर्ण विज्ञान, कविता पब्लिकेशन, औरंगाबाद- पवार राम
4. संपूर्ण विज्ञान, दिपस्तंभ प्रकाशन, जळगाव - पाटील जयदीप
5. संपूर्ण विज्ञान तंत्रज्ञान, जिज्ञासा प्रकाशन, पुणे- धात्रक विनया
6. सामान्य विज्ञान, ज्ञानदिप ॲकॅडमी, पुणे- भस्के सचिन
7. सामान्य विज्ञान, लुसेंट पब्लिकेशन, पटना- कुमार संजीव
8. Fastract Science, ओंकार पब्लिकेशन, औरंगाबाद- वसे सतिश
9. कॉम्पिटिट्व्ह सायन्स, विनर्स पब्लिकेशन, औरंगाबाद- कोलते अनिल अप्पाराव
10. विज्ञान तंत्रज्ञान आणि विकास, भगीरथ प्रकाशन, पुणे- कोळंबे रंजन
11. संपूर्ण सामान्य ज्ञान, अनिरुध्द पब्लिकेशन हाऊस, पुणे- भालेराव कविता
12. महाराष्ट्रराज्य पाठयपुस्तक निर्मिती मंडळ, पुणे- इ. 8 वी, 9 वी व 10 वी विज्ञान.
13. इ. 8 वी, 9 वी व 10 वी विज्ञान पाठ्यपुस्तक- NCERT, दिल्ली
14. भौतिकशास्त्र - इ. 11 वी व 12 वी विज्ञान (NCERT व महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ, पुणे)


.............

D:\Som2\Dept./Adm Ser.TY syllabus 1.p65 27

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

**B.A. In Administrative Service**

तृतीय वर्ष

**Semester - V & VI**

प्रश्नपत्रिकेचे प्रारुप

(सर्व अभ्यासपत्रिकेसाठी)

संत्रात परीक्षा (ESE)

वेळ 2 तास | गुण 50

---

| | | |
|---|---|---|
| प्रश्न - 1 | सर्व अभ्यास घटकावर आधारित बहुपर्यायी वस्तुनिष्ठ 10 प्रश्न देण्यात यावेत. | गुण 10 |
| प्रश्न - 2 | दीर्घोत्तरी स्वरूपाचे दोन प्रश्न विचारण्यात यावेत पैकी एक प्रश्न सोडवावयाचा आहे. | गुण 10 |
| प्रश्न - 3 | दीर्घोत्तरी स्वरूपाचे दोन प्रश्न विचारण्यात यावेत पैकी एक प्रश्न सोडवावयाचा आहे. | गुण 10 |
| प्रश्न - 4 | दीर्घोत्तरी स्वरूपाचे दोन प्रश्न विचारण्यात यावेत पैकी एक प्रश्न सोडवावयाचा आहे. | गुण 10 |
| प्रश्न - 5 | टिपा लिहा. (चार पैकी दोन) (प्रत्येकी 5 गुण) | गुण 10 |

## अंतर्गत मूल्यमापन परीक्षा (CA) — 25 गुण

| | | |
|---|---|---|
| 01. | प्रत्येक सत्रात प्रत्येकी 05 गुणांच्या दोन घटक चाचण्या | गुण 10 |
| 02. | गृहपाठ | गुण 10 |
| 03. | सेमीनार | गुण 05 |

******